महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४८ वे | दिनांक : २२/०५/२०२६ | वार : शुक्रवार

## पंतप्रधान नरेंद्र मोदींवर नाना पटोलेंची टीका; 'देशाची प्रतिमा मलिन झाली'



**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी तरुण पिढीचा उल्लेख 'कॉकरोच' असा केल्याच्या पार्श्वभूमीवर आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या ट्रेंडचा संदर्भ देत, काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. देशाच्या तरुण पिढीला अशा प्रकारची उपमा दिली जाणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत, तरुणांचा सातत्याने होणारा अपमान आणि वाढती बेरोजगारी यामुळेच आजच्या तरुण वर्गात केंद्र सरकारविरोधात तीव्र असंतोष खदखदत असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले.

नाना पटोले म्हणाले, देशातील सुशिक्षित तरुण-तरुणी आणि पदव्युत्तर पदव्या घेऊनही बेरोजगार बसले आहेत. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून कधी त्यांना पकोडे तळण्याचा सल्ला दिला जातो, तर कधी इतर गोष्टि सांगितल्या जातात. तरुणांचा हा पदोपदी होणारा अपमान आता त्यांच्या सहनशीलतेच्या पलीकडे गेला आहे.


पंतप्रधानांमुळे जागतिक पातळीवर देशाची मन शर्मेने खाली गेली आहे. जागतिक पातळीवर पंतप्रधान रिजेक्ट माल आहेत, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे. मोदींच्या परदेश दौरे आणि त्यात होणाऱ्या घडामोडींवरून नाना पटोले यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, देवेंद्र फडणवीस नेहमी सांगतात की, पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशाचा फायदा होतो, अनेक महत्त्वपूर्ण करार केले जातात. मात्र, आता फडणवीसांनीच यावर उत्तर दिले पाहिजे की, इटलीमध्ये जाऊन तिथल्या महिला राष्ट्राध्यक्षांना चॉकलेटची भेट देणे कितपत योग्य आहे? पंतप्रधानांचे हे वर्तन हास्यास्पद असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.

काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांच्यावर रिजेक्ट माल म्हणून देवेंद्र फडणवीसांनी टीका केली होती. त्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले, जे राहुल गांधींना रिजेक्ट माल म्हणत होते, त्यांनी आता पहावे की, त्यांचे स्वतःचे पंतप्रधान आज जागतिक पातळीवर रिजेक्ट माल ठरत आहेत. पंतप्रधानांच्या अशा कृतींमुळे देशाची प्रतिष्ठा धुळीस मिळत आहे. पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांमुळे देशावर मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार पडत असून, या दौऱ्यांमधून देशाच्या पदरात काय पडले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

## पेपर खरेदी प्रकरणात लातूर-नांदेडचे ५ डॉक्टर सीबीआयच्या रडारवर



**लातूर :** मी 'ट्यूशन एरिया'त उभा आहे. नीट पेपरफुटीमुळे हा परिसर ओस पडला आहे. सुमारे ५० हजार विद्यार्थी आपल्या गावी परतल्यामुळे दिवसाकाठी क्लासेसची फी, मेस, हॉस्टेल्समधून होणारी सुमारे २ कोटींची उलाढाल ठप्प झाली आहे. २ जूनपर्यंत सर्व क्लासेस बंद ठेवण्यात आले आहेत. री-नीट परीक्षेच्या टेस्ट सिरीजसाठी केवळ दीड हजार विद्यार्थीच लातुरात थांबले आहेत.

नीट, जेईई आणि सीईटी परीक्षांची तयारी करून घेणारे ५५ पेक्षा जास्त क्लासेस आहेत. यामध्ये दरवर्षी जवळपास ६० हजारपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेश घेतात. यातील प्रमुख ५ ते ६ मोठ्या क्लासेसमध्येच ८० टक्के विद्यार्थी शिकतात. उर्वरित २० टक्के विद्यार्थी अन्य ५० लहान क्लासेसमध्ये शिक्षण घेतात. एका विद्यार्थ्याची वार्षिक क्लास फी ४० हजार ते ८० हजार रुपयांपर्यंत आहे. केवळ क्लासेसच्या माध्यमातून वर्षाला ३०० कोटींची उलाढाल होते.

लातूरमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर येथील ४०० हॉस्टेल व २८० मेस (खानावळ) व्यवसाय अवलंबून आहेत. विद्यार्थ्यांकडून राहणे आणि जेवणासाठी वर्षाला ६० हजार ते १ लाख २० हजार रुपये आकारले जातात. यातून राहणे-खाणे व इतर खर्चाच्या रूपाने शहरात वार्षिक ४५० कोटींची उलाढाल होते. मात्र, आता विद्यार्थीच नसल्याने ४०० पैकी केवळ ४० ते ५० हॉस्टेल व २८० पैकी फक्त २५ मेस कशाबशा सुरू आहेत. ग्राहकांअभावी व तोट्यामुळे अनेकांनी आपले हॉस्टेल तात्पुरते बंद केले. सुरू असलेल्या मेस चालकांनी महिन्याला ३०० रुपयांची दरवाढ केली.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. परिणामी, विद्यार्थी लातूरला येऊन अभ्यास करण्याऐवजी घरूनच री-नीट परीक्षेची तयारीत आहेत. पुन्हा विद्यार्थी लातूरला येतील का, या भीतीने स्थानिक व्यावसायिक चिंतेत आहेत. आता २ जून रोजी सुरू होणाऱ्या नवीन बॅचला विद्यार्थी किती संख्येने उपस्थित राहतात, यावरच लातूरच्या या ७५० कोटींच्या अर्थकारणाचे भविष्य अवलंबून असेल.

कोचिंग हब म्हणून प्रसिद्ध भागात काही क्लासचालक व पालकांची चौकशी झाली. मात्र याला अधिकृत दुजोरा मिळू शकला नाही. पेपरसेटर प्रा.कुलकर्णीने शाहुनगरात नियम मोडून बांधकाम केले. त्याला पालिकेने नोटीस बजावली.

सीबीआयने नांदेडमध्ये १० पालकांना चौकशीसाठी पुण्याला हजर राहण्याची नोटीस दिली आहे. त्यात ३ डॉक्टरांचा समावेश आहे. हे सर्व मोटेगावकरच्या संपर्कात होते. त्यांनी पाल्यासाठी प्रश्नपत्रिका मिळवल्याचा संशय आहे.

प्रा. मोटेगावकरच्या क्लासेसशेजारील सीतारामनगर येथील वसतिगृहात एका विद्यार्थ्याची ३ तास चौकशी करण्यात आली. या मुलाचे आधार कार्ड, पॅनकार्ड या कागदपत्रांसह त्याचा जबाब नोंदवून हे पथक निघून गेले.

सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणात अटक केलेल्या पेपरसेटर प्रा. पी. व्ही. कुलकर्णीने पुण्यातील स्वतःच्या घरात विद्यार्थ्यांचे खास क्लास घेऊन नीट परीक्षेतील प्रश्न त्यांना पुरवले, अगदी तसेच क्लास त्याने लातूर शहरातील एका बालरोगतज्ज्ञाच्या इमारतीतही घेतल्याची माहिती समोर आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ मे २०२६


## एस.टी बसची दुचाकीला धडक युवक ठार



**दौलताबाद** : दौलताबाद घाटातील मोठ्या वळणावर गुरुवारी दुपारी २.३० वाजता झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. एस.टी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत हा अपघात घडला.मिळालेल्या माहितीनुसार, शिवपूर–चाळीसगाव येथून छत्रपती संभाजीनगरकडे येणारी एस.टी. महामंडळाची बस (क्र. एमएच १५ जे डब्ल्यू ०८७५) दौलताबाद घाटातील मलिक फोर्ट हॉटेलसमोरील मोठ्या वळणावर आली असता समोरून येणाऱ्या शाईन दुचाकीला (क्र. एमएच ४८ एक्स २२८५) जोरदार धडक दिली.या अपघातात दुचाकीस्वार निवृत्ती वाल्मिक दांडेकर (वय ३१, रा. लोणी बोडखा, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना दुपारी ३.१५ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.निवृत्ती दांडेकर हे दुपारच्या सुमारास दौलताबाद येथून आपल्या गावी लोणी बोडख्याकडे जात होते. त्यांच्या अपघाती निधनामुळे लोणी बोडखा गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे.या घटनेची नोंद दौलताबाद पोलीस ठाण्यात करण्यात आली.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## चिमुकलीच्या प्रामाणिकपणाचे कौतुक; दीड तोळ्याची सोन्याची चैन केली परत




**दौलताबाद (प्रतिनिधी)** : चिमुकल्या मुलीला सापळलेली तब्बल दीड दिड तोळ्याची सोन्याची चैन परत केली उन्हाळ्या चे दिवस असल्याने दौलताबाद येथील आसलेल्या एच २ वाटर पार्क येथे मोठ्या संख्येने पर्यटक हे पाण्याचा राईट चा आनंद घेण्यासाठी येत आसतात आसे एक डॉक्टर कुटुंब हे त्या मित्रा सोबत आले होते वाटर पार्क मधे पाण्याचा आनंद घेत आसताना दिड तोळ्याची सोन्याची चैन केव्हा गळ्यातुन पडली कळले नाही बराच वेळाने लक्षात आले आणी शोधा शोध सुरू झाला पाण्यात .. जवळ पास ३ तासा नतर एका छोट्या मुलीला ती पाण्यात खेळताना पायात अडकली त्याचे झाले असे की दि २१ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अमोल तारु रा.छत्रपती सभाजीनगर हे त्याचे मित्र डॉ राहुल गोसावी रा धुळे ,डॉ अशोक बोलकर रा राजनगाव, बाबासाहेब जाधव सर्व जन कुटुंब सोबत दौलताबाद येथील एच टु वाटर पार्क येथे आले होते . दुपारी पाण्यात खेळत खेळता गळ्यातील दिड तोळ्याची चैन हि केव्हा पाण्यात पडली कळले नाही बराच वेळाने लक्षात आले की चैन पडली आहे पाण्यात शोधाशोध सुरू झाली पर्यटन मोठ्या संख्येने असल्याने नेमक विचार पुस करायची कोन्हाला आसा प्रश्न पडला होता अमोल तारु यांनी या बाबत एच २ वाटर पार्क चे व्यवस्थापन हर्षल भारुका याना सांगितले हर्षल भारुका यानी कर्मचारी याना पाण्यात शोधाशोध करण्यास सांगितले .. तीन तास शोधाशोध चालू होते त्या वेळी त्या ठिकाणी किजल ज्ञानेश्वर शिरसागर हि छोटीशी मुलगी तीच्या कुटुबा सोबत वाटर पार्क येथे आलेली होती पाण्यात खेळता खेळता तिच्या पायात काही तरी अडकले तिने काय अडकले , काय अडकले हे पाहीले तेव्हा ती दिड तोळ्याची सोन्याची चैन होती तीने ती चैन तिचे वडिल ज्ञानेश्वर शिरसागर यांच्या कडे दिली शिरसागर याठी सरळ वाटर पार्क चे तिकीट घर गाठले त्या ठिकाणी असलेले हर्षल भारुका याना सर्व प्रकार सागिला. हर्षल भारुका व ज्ञानेश्वर शिरसागर यांनी डॉ अमोल तारु याना संपर्क करत किजल च्या हस्त दिड तोळ्याची सोन्याची चैन वापस केली . यावेळी तारु कुटुब चा जीव पारड्यात पडला त्याच्या चेहर्यावचा आनंद बघण्या सारखा होता त्यानी किजल व वडिल ज्ञानेश्वर शिरसागर आणी हर्षल भारुका याचे आभार मानले अजुन हि इमानदारी खरे पणा शिल्लक आहे आसे वक्तव्य त्यांनी केले यावेळी किजल चा छोटासा सत्कार हि केला ...


**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)**
**विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ मे २०२६


## परी ग परी

परी ग परी
येतेस का घरी
तुला ग पाहून
चकीत होतील सारी

खेळण्यात मी
सारखी असते गर्क
सरांनी सांगितलेला
करशील का होमवर्क

दिवसभर काम करून
थकून जाते आई
तिला मदत करण्याची
करशील का घाई

शाळेला उशीर होता
छडी देतात सर
रोज शाळेला नेशील का
बसवूनी तुझ्या पंखावर

खरच असं झालं तर
किती येईल मजा
पाठीवर राहणार नाही
दप्तराचा बोजा!



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## नियतीचा खेळ भारी

खेळ हा जीवनाचा भाऊ,
अचानक बदलतो असा.
समजत नाही कोणालाच,
तेव्हा मार्ग काढावा कसा.१

कळत नाही कोणाला,
नियतीचा खेळ भारी.
अति झाल्यास मात्र,
कर्माने चोप देतो सारी. २

नियतीचा खेळ भारी,
अचानक करतो वार.
अति होता मनात गर्व,
देणारच नकळत मार. ३

पापाचा घडा भरायला,
भरपूर लागतो वेळ.
घडा भरता पापाचा,
नाही लागणार मेळ. ४

नियती देतो सर्वांना,
सुधारण्यासाठी वेळ.
नाही सुधारणा झाल्यास
करतो हिशोबाने खेळ. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## आपल्यातले विद्वान कर्तेसुधारक लोक हेच खरे खुरे आयडॉल्स होत - आरुष कवठाळे




**उदगीर :** शासकीय योजना राबवण्यासाठी काही व्यक्ती व संस्था पुढे येतात प्रकल्पाचे काम संपले की सामाजिक भानही संपत आणि ते स्वतःच्याच कोशात अडकतात. परंतु काही लोक स्वतःच्या पलीकडे जाऊन इतरांसाठी विविध क्षेत्रात समर्पण भावनेने पतदर्शक काम करणारे असतात. असे आपल्यातलेच विद्वान सुधारक कर्ते लोक हेच खरे खुरे आयडॉल्स होत. असे मत आरुष जयश्री अमित कवठाळे यांनी व्यक्त केले . चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत आयोजित ३६१ व्या विशेष बालवाचक संवादामध्ये इयत्ता चौथीत शिकणारा आरुष जयश्री अमित कवठाळे हा विद्यार्थी सुहास कुलकर्णी लिखित खरेखरे आयडॉल्स या साहित्यकृतीवर संवाद साधला. यावेळी बोलताना तो म्हणाला की, नव्या जगाचा - नव्या समाजाचा आणि नव्या प्रश्नांचा थांग पता शोधणे यासाठी प्रयोगशीलता, अभ्यास वृत्ती, सामाजिक सजगता आणि विश्वासाहार्यता आदी अंगभूत गुण असणे गरजेचे असते. तरच समाजाच्या मूल्याचा विचार करून त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करणे शक्य होते. या सर्व बाबींचा सविस्तर उहापोह खरेखरे आयडॉल्स या पुस्तकात करण्यात आला असून डॉ. विकास आमटे , डॉ. अजय आणि राणी बंग, मेघा पाटकर, डॉ. माधव चव्हाण, पोपटराव पवार आदींसह एकूण 25 व्यक्तिमत्त्वाचा जीवन प्रवास व त्यांच्या कार्यकर्तत्वाचा गौरव या साहित्यकृतीत केलेला आहे. या संवादा नंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला विशेष म्हणजे इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून अनेकांनी वेगवेगळी प्रश्न विचारली आणि या सर्व प्रश्नांची उत्तरे आरुष कवठाळे यांनी अत्यंत चपलकपणाने दिली. कुठल्याही प्रश्नाला न अडखळता सडेतोड उत्तर देऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. त्याबद्दल सर्वांनीच आरुषचे कौतुक केले. यानंतर उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके आणि डायरीचे वाटप करण्यात आले. यानंतर अध्यक्षीय समारोपात जयश्री कोठाळे म्हणाल्या की, आपला भवताल आणि स्वतःपलीकडचं जग समजून घ्यायचा असेल तर अशी पुस्तके वाचली पाहिजेत. त्या दृष्टीने वाचक संवाद हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. याचा फायदा जास्तीत जास्त लोकांनी घेतला पाहिजे. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या विशेष बालवाचक संवादात संपूर्ण जबाबदाऱ्या या बाल विद्यार्थ्यांनीच पार पडल्या. चौथीत शिकणाऱ्या आरुषने संवाद साधला तर इयत्ता सहावीत शिकणारा ऋषिकेश अनुपमा अनिल कापडे या विद्यार्थ्याने या कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केलं. यावेळी स्वागत गीत कुमारी आर्कषिका वर्षा अश्विन हवा ही पाचव्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनी व अन्वी जयश्री अमित कवठाळे या तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. या बाल संवादकाचा परिचय अक्षित नर्मदा मनोहर भालके या तिसरी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी करून दिला. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या विशेष बालवाचक संवादाचा आभार प्रदर्शन इयत्ता सहावी मध्ये शिकणारी अवनी मनीषा वीरभद्र स्वामी या विद्यार्थिनीने मानले.

## तोफखाना केंद्रीय विद्यालयात इयत्ता अकरावी व बारावीच्या रिक्त जागांसाठी प्रवेशाची संधी

**नाशिक रोड (प्रतिनिधी) :** शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नासिक रोड कॅम्प येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी उर्वरित रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विविध शाखांमध्ये प्रवेश उपलब्ध असल्याची माहिती प्राचार्य गजराज मीना यांनी दिली आहे. विद्यालयात इयत्ता अकरावीसाठी वाणिज्य व कला शाखांमध्ये तर इयत्ता बारावीसाठी विज्ञान, वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांमध्ये रिक्त जागांवर प्रवेश दिला जाणार आहे.प्रवेशासाठी ऑफलाइन नोंदणी प्रक्रिया दि. २२ मे २०२६ पासून सुरू होऊन ३० मे २०२६ पर्यंत चालणार आहे. सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह विद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक सुट्टी असल्यास पुढील कामकाजाच्या दिवशी नोंदणी प्रक्रिया केली जाईल, असे कळविण्यात आले आहे.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ मे २०२६


## जनतेच्या त्यागावर उभे राहिलेले देशभक्तीचे राजकारण

एका बाजूला देशातील सामान्य जनतेला “इंधन वाचवा”, “सोने खरेदी टाळा”, "तेल कमी वापरा", “परदेश दौरे कमी करा” असे उपदेश दिले जात आहेत; तर दुसऱ्या बाजूला सत्तेच्या वैभवशाली विमानांचे आकाशातले फेरे, गाड्यांचे ताफे थांबायचे काही नाव घेत नाहीत. फक्त एका दिवसाची सायकल, बाईक सवारी, लोकलने प्रवास. हा फक्त देखावा आहे. एका बाजूला गृहिणी गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतीसमोर आणि तुटवड्यासमोर हतबल उभी आहे; तर दुसऱ्या बाजूला कॉर्पोरेट नफ्यांचे आकडे विक्रमी उंची गाठत आहेत. हा केवळ विरोधाभास नाही. ही भारतीय लोकशाहीतील वाढत्या वर्गविभाजनाची भयावह खूण आहे.भारतात निर्माण झालेले इंधनसंकट/ उर्जासंकट हे केवळ आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे अपरिहार्य परिणाम आहेत, असे सांगितले जात आहे. पण वास्तव इतके सरळ नाही. कोणत्याही संकटाची कारणे केवळ बाह्य नसतात; ती अंतर्गत राजकीय प्राधान्यक्रमांमध्ये दडलेली असतात. प्रश्न असा आहे की, देशाच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू राष्ट्रीय हित आहे की काही निवडक आर्थिक शक्तींचे संरक्षण?मार्क्सवादी विश्लेषण सांगते की राज्य हे तटस्थ नसते; ते सत्ताधारी आर्थिक वर्गाच्या हितसंबंधांचे राजकीय व्यवस्थापन करणारे साधन बनते. आज भारतात घडणाऱ्या घटना पाहिल्या, तर हा सिद्धांत भयावहपणे खरा वाटू लागतो. ऊर्जा, बंदरे, विमानतळ, पायाभूत सुविधा, माध्यमे, शिक्षण, उद्योग इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये काही मोजक्या कॉर्पोरेट घराण्यांचे वाढते केंद्रीकरण दिसत आहे. राज्यसत्ता, धर्मसत्ता आणि भांडवलदार यांच्यातील ही जवळीक हळूहळू मोठ्या भांडवलदारांच्या हितासाठी काम करणाऱ्या व्यवस्थेत बदलत चालली आहे, लोकशाही ही जनतेच्या हितासाठी, संविधानाच्या मूल्यांवर चालणारी स्वतंत्र व्यवस्था राहिली नाही.महात्मा जोतीराव फुले यांनी “शेतकरी हा राज्याचा पोशिंदा असूनही सर्वाधिक पिळवटला जातो,” असे सांगताना ज्या शोषणव्यवस्थेवर प्रहार केला होता, तिचे आधुनिक रूप आज अधिक प्रबळ झालेले दिसते. पूर्वी धर्म, जात आणि अज्ञान यांच्या माध्यमातून शोषण होत होते; आज त्यात कॉर्पोरेट माध्यमे, प्रतिमानिर्मिती आणि डिजिटल प्रचारयंत्रणा जोडली गेली आहे. जनता वास्तवापासून दूर राहावी, प्रश्न विचारू नयेत, असंतोषाचे रूपांतर भावनिक भक्तीत व्हावे. हीच या नव्या व्यवस्थेची राजकीय गरज बनली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचे मर्म सांगताना स्पष्ट केले होते की, सामाजिक आणि आर्थिक समता नसताना राजकीय लोकशाही ही केवळ दिखावा ठरते. आज भारतात मतदानाचा अधिकार सर्वांना आहे; पण आर्थिक संसाधनांवर नियंत्रण कोणाचे आहे? देशातील सरासरी ८१ कोटी लोकांना रेशनवर किंवा दारिद्र्य रेषेखालील जगावे लागते, ही वस्तुस्थिती केवळ दारिद्र्याचे निदर्शक नाही; ती विकासाच्या दाव्यांवर कठोर आरोपपत्र आहे.जर देश खरोखर आर्थिक महासत्ता बनत असेल, तर मग एवढ्या प्रचंड लोकसंख्येला मोफत धान्यावर का जगावे लागते? जर विकास सर्वसमावेशक असेल, तर मग शेतकरी आत्महत्या, दलित- आदिवासी- ओबीसी आणि स्त्रीयांवरील वाढता अत्याचार व हिंसा, शिक्षणातले प्रश्न, बेरोजगारी, महागाई आणि स्थलांतरित मजुरांचे प्रश्न इतके तीव्र का आहेत? जर अर्थव्यवस्था मजबूत असेल, तर मग सामान्य नागरिकाला देशभक्तीच्या नावाखाली प्रत्येक संकटात त्यागाचे उपदेश आणि काटकसरीचे धडेच का दिले जातात?फुले-आंबेडकरी दृष्टिकोन इथे अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कारण तो केवळ आर्थिक विषमता पाहत नाही; तर त्या विषमतेला टिकवून ठेवणाऱ्या सांस्कृतिक आणि मानसिक गुलामीलाही ओळखतो. आज भारतात जनतेला स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा नागरिक म्हणून नव्हे, तर अंधभक्त म्हणून घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रश्न विचारणारा संशयित किंवा देशद्रोही ठरवला जातो आणि स्तुती करणारा राष्ट्रभक्त. ही लोकशाहीची नव्हे, तर व्यक्तिपूजेची लक्षणे आहेत.माध्यमांची भूमिकाही येथे गंभीरपणे तपासावी लागेल. लोकशाहीत माध्यमे ही सत्तेवर नजर ठेवणारी संस्था असतात; पण जेव्हा माध्यमेच सत्तेच्या प्रतिमानिर्मितीची एजन्सी बनतात, तेव्हा समाजाचे बौद्धिक आरोग्य धोक्यात येते. इंधनसंकट, बेरोजगारी, आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक विषमता, परराष्ट्र धोरणातील विसंगती या प्रश्नांवर सखोल चर्चा होण्याऐवजी जनतेसमोर फोटो, इव्हेंट, भावनिक घोषणाबाजी आणि कृत्रिम राष्ट्रवादाचे अखंड प्रदर्शन उभे केले जाते.मार्क्सने याला “खोटे भान” म्हटले होते. शोषित वर्गाने आपल्या शोषणाची कारणे समजू नयेत म्हणून त्याच्या भावनांचे व्यवस्थापन केले जाते. भारतात आज हे व्यवस्थापन अत्यंत संघटित पद्धतीने घडताना दिसते. बेरोजगार युवकाला रोजगाराऐवजी धार्मिक ध्रुवीकरण दिले जाते. महागाईने त्रस्त कुटुंबाला अर्थकारणाऐवजी भावनिक राष्ट्रवाद दिला जातो. शेतकऱ्याला हमीभावाऐवजी घोषणांचा पाऊस दिला जातो.याहून धोकादायक म्हणजे राष्ट्रभक्तीची बदलती व्याख्या. राष्ट्र म्हणजे जनता की सत्ता? हा मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. कारण लोकशाहीत सरकारवर टीका करणे हे राष्ट्रद्रोह नसते; उलट सत्तेला जबाबदार धरणे हीच खरी राष्ट्रनिष्ठा असते. पण आज परिस्थिती अशी निर्माण केली जात आहे की, सरकार म्हणजेच राष्ट्र आणि नेत्यावर टीका म्हणजे देशावर टीका ही धोकादायक मानसिकता समाजात रुजवली जात आहे.भारतातील संकट हे केवळ इंधनाचे नाही; ते विवेकाच्या क्षयाचे आहे. प्रश्न पेट्रोलच्या किमतींचा नाही; प्रश्न आहे लोकांच्या श्रमावर उभ्या राहिलेल्या संपत्तीचे नियंत्रण कोणाच्या हातात जात आहे याचा. प्रश्न गॅस सिलेंडरचा नाही; प्रश्न आहे सामान्य माणसाच्या जगण्याला सतत असुरक्षित करून काही मोजक्या वर्गाच्या अमर्याद वैभवाचे संरक्षण करण्याचा.म. फुले यांनी सत्यशोधकतेचा संदेश दिला. बाबासाहेबांनी “शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” हा मार्ग दिला. मार्क्सने वर्गजाणीवेची दिशा दिली. या तिन्ही विचारधारांचा समान धागा एकच आहे तो म्हणजे शोषितांनी वास्तव ओळखले पाहिजे. कारण अन्यायाची सर्वात मोठी ताकद म्हणजे पीडितांची भ्रमित शांतता.आज गरज आहे ती फोटोभक्तीची नाही; तर वास्तवभानाची. घोषणांची नाही; तर प्रश्नांची. व्यक्तिपूजेची नाही; तर संविधानिक लोकशाहीची. कारण इतिहास सांगतो जेव्हा जनता स्वतःच्या दुःखाची कारणे ओळखू लागते, तेव्हा सत्तेच्या सर्वात भव्य किल्ल्यांनाही तडे जाऊ लागतात.आणि म्हणूनच, आजचा सर्वात मोठा राष्ट्रधर्म कोणता असेल, तर तो अंधभक्ती नव्हे; तर जागृत विवेकाचा. कारण विचार करणारी जनता हीच कोणत्याही लोकशाहीची शेवटची आणि खरी आशा असते.

**- प्रभाकर गायकवाड**
**मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादाचे अभ्यासक**

## तिफनकार

तिफन खांद्यावर घिसन तो निंघाला...
पन शेत बांधावरचं नी होतं..
कागदाचं होतं पांढरंफक रान
शाईच्या थेंबात भिजोईसन शब्द
तो पेरत गेला मानसाचं भान

धार होती नी नागराले
होती येसन ओळीयची
बैल जुपले नी जू ले,
कवितायच्या ओळीच
धावत पयत सुटल्या
मनाच्या माळरानावून सुसाट

ना कोन्ह मुजरा केला,ना टाया टिपल्या
तो गाजावाजा टावून चालत राहाला
यका हाती पेनाचं टोक,
दुसऱ्या हाती कायजाचा कोपरा..
संगं दोन्हीच्या तो बांधावर उभा राहला

'भाकरीचा' वास शब्दायतून आला
'गावकुसा'बाहिरचं दुख त्यानं सांगलं
'इडा-पिडा' घिऊन तो पावसात भिजला,
'अथांग' डोहात स्वतःले च शोधत राहला
'तिफन' धरतांना घाम गायला
'बाभळी'( बाभुय) च्या काट्यावरून
मायेनं हात त्यानं फिरोयला

पोऱ्ह शायीतले म्हनता 'आमचे मास्तर'
लिहिते हात म्हंता 'आमचा गुरू'
वाचनारं कायिज म्हंत आपला मानूस
डाक्तरकी,प्राध्यापकी इसरून सारी
तो राहाला फक्त...तिफनकार....
शब्द पेरता येनारा शेतकरी

संमेलनाच्या मंचावर गेला
तरी बोलला रानातल्या भाषेत
सत्कारायचे हार गयात पडले
पन गरिबिले काहीच भूलला नी
कारन...त्याले माहीत होतं
की,
पीक पदवीचं नसतं ते घामाचं असतं

अजूनबी तो दिसतो बांधावर
नव्या पानायवर नव्या सऱ्या ओहळता
ओहळता
एका डोयात आसवायची वल
अन् दुसऱ्यात येनाऱ्या काल ची चाहूल
झिजीन तिफन,हात बी थकतीन
पन...
पन त्यानं पेरेल ओळी
कायजाच्या पोटखराब जमीनीवरबी
उगोयत राहातीन पिढ्या दर पिढ्या

कारन तिफनकार लोकमानसात
अजरामर आय
तो फक्त बीजवाई होतो , मातीत
रूजतो....
अन् पुन्हा सबद बनीसन उगोयतो.

- **मुळ कविता**
लक्ष्मण वाल्डे
- **अनुवाद**
प्रा.संध्या महाजन


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.